**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**गुरुवार, दिनांक : ८ ऑगस्ट, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ आज लोकसभेत सादर: धार्मिक संस्थांच्या स्वातंत्र्याला याद्वारे धक्का लावला जाणार नसल्याची अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू द्वारा ग्वाही.**
2. **मुख्यमंत्री कृषी आणि अन्न प्रक्रिया योजना २०२४-२५ साठी सुमारे २४ कोटी ७५ लाख रुपये एवढा निधी कृषी आयुक्त यांना वितरित करण्यास शासनाची मान्यता.**
3. **नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात** 44 **किलोमीटरचे चार मेट्रोमार्ग प्रस्तावित- मेट्रोने दररोज प्रवास करणाऱ्यांची संख्या ९५ हजारांवर.**
4. **इसरो मधील वैज्ञानिकांच्या प्रयत्नांमुळे चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ उतरणारा भारत हा पहिला देश ठरल्याचं चांद्रयान-**3 **चे प्रकल्प संचालक डॉ.पी.वीरमुथुवेल यांचं नागपुरात प्रतिपादन**
5. **यवतमाळच्या मुकूटबन इथल्या डॉ विवेक पोलशेट्टीवार यांना रसायनशास्त्राचा शांती स्वरूप भटनागर पुरस्कार जाहीर**.

#####

**लोकसभा/वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४**

लोकसभेत आज वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी सादर केलं. यात वक्फ कायदा १९९५ मध्ये सुधारणा करुन राज्य वक्फ बोर्डांचे अधिकार आणि कार्यप्रणाली तसंच वक्फ मालमत्तेची नोंदणी आणि सर्वेक्षणाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. कोणत्याही धार्मिक संस्थांच्या स्वातंत्र्याला याद्वारे धक्का लावला जाणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. अल्पसंख्याकांना न्याय देण्यासाठी हा कायदा आणण्यात आल्याचं सरकारनं म्हटलं आहे. मात्र विरोधी पक्षांनी या विधेयकाला कडाडून विरोध केला आहे. काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं या विधेयकाच्या विरोधात बोलताना सर्वपक्षीय बैठक बोलावून सूचना घेण्याची मागणी केली आहे.

**बांगलादेश**

बांगलादेशात आज नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारचा शपथविधी होणार असल्याचं बांगलादेशाचे लष्कर प्रमुख जनरल वकार- उज-जमा यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. हंगामी प्रधानमंत्री मोहम्मद युनुस यांच्यासह १५ मंत्री आज शपथ घेतील. येत्या ३ ते ४ दिवसांत देशातली परिस्थिती नियंत्रणात येईल अशी आशा व्यक्त करत हिंसाचारात सहभागी असणाऱ्या दोषींवर लवकरच कडक कारवाई करण्यात येईल असंही वकार यांनी सांगितलं.

दरम्यान बांगलादेशात अडकलेले राज्यातील विद्यार्थी, अभियंते इत्यादींना मदत करणे आणि त्यांना मायदेशात परत आणण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या सुटकेसाठी सर्व उपाययोजना करण्यात येतील. यासाठी विशेष विमानांची व्यवस्था करण्यात येईल, असं जयशंकर यांनी या चर्चेदरम्यान मुख्यमंत्री शिंदेंना सांगितलं.

**कृषी व अन्न प्रक्रिया योजना**

मुख्यमंत्री कृषी आणि  अन्न प्रक्रिया योजना सन 2024 -25 मध्ये राबविण्याकरिता 24 कोटी 74 लाख 82 हजार रुपये एवढा निधी कृषी आयुक्त यांना वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे.

राज्यातील अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना देणे, शेतमालाचे मूल्यवर्धन करणे तसेच शेतकऱ्यांच्या  सहभागाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्थापित करण्यास प्रोत्साहन देऊन उत्पादित अन्न पदार्थांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी  ही शंभर टक्के राज्य पुरस्कृत योजना सुरू करण्यात आली आहे. त्यानुषंगाने मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजनेसाठी सन 2024 -25 च्या अर्थ संकल्पामध्ये  75 कोटी रुपये एवढ्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

**नागपूर मेट्रो**

नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या दुसर्या टप्प्यात चार  मेट्रोमार्ग प्रस्तावित असून त्यांची  एकूण लांबी 44 किमी आहे. यासाठी   6 हजार 708 कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असून या टप्प्यात   एकूण 32 स्थानकं  असतील अशी माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हार्डीकर यांनी आज नागपूरातील मेट्रो भवन इथ  प्रसार माध्यमांशी बोलताना दिली .

दुसर्या टप्प्यातल्या  पहिल्या रिच मध्ये खापरी ते बुटिबोरी , रिच 2 मध्ये ऑटोमोटीव्ह चौक ते कन्हान, रिच 3 मध्ये  लोकमान्य टिळक नगर ते हिंगणा, रिच 4 मध्ये प्रजापती

नगर ते कापसी ट्रान्सपोर्ट नगर या 4 मेट्रो मार्गांचा  समावेश आहे. शहरातील बस, रेल्वे आणि मेट्रो वाहतूक व्यवस्था यांत परस्पर समन्वय साधून नागरिकांना सुलभ वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी महामेट्रो द्वारा  'मल्टी मोडल इंटीग्रेशन 'या विभागाची स्थापना करण्यात आल्याची माहिती हार्डीकर यांनी दिली.

या विभागाव्दारे 'लास्ट माईल कनेक्टेविटी' अंतर्गत ई-रिक्षा ई-स्कूटर, मनपा बसेस या फिडर सेवेच्या माध्यमातून मेट्रो स्थानकां पर्यंत पोहोचण्यासाठी व्यवस्था उपलब्ध  करून देण्यात येत असल्याचही त्यांनी स्पष्ट केलं. सध्या नागपूर मेट्रोची सरासरी प्रवासी संख्या  प्रति दिन 95 हजार असून ती 1 लाखापर्यंत नेण्याचा  मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

## बुद्धदेव भट्टाचार्य निधन

पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांचं आज कोलकाता इथं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. २००० ते २०११ असे तब्बल ११ वर्ष  त्यांनी पश्चिम बंगालचं मुख्यमंत्रीपद भूषवलं होतं. भट्टाचार्य यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. भट्टाचार्य यांनी बांधिलकी जपत राज्याची सेवा केली असं मोदी म्हणाले.

## राष्ट्रवादी जनसन्मान यात्रा

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेला आजपासून सुरुवात होत आहे. त्या निमित्तानं  दिंडोरी इथं  आयोजित जाहीर सभेला आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबोधित केलं.  रक्षाबंधनाच्या निमित्तानं माझी लाडकी बहीण योजना सुरू झाली असून १७ ऑगस्ट रोजी जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे ३ हजार रुपये मिळणार आहेत. नियमात बसणाऱ्या महिलांच्या खात्यात हे पैसे जमा होतील, अशी माहिती त्यांनी यावेळी संबोधनातून  दिली.

## व्हीएनआयटी  स्पेस डे

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रो मधील वैज्ञानिकांच्या सामूहिक प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणूनच चंद्रयान 3  मोहिमेच्या माध्यमातून  चंद्राच्या  दक्षिण ध्रुवाजवळ उतरणारा भारत हा पहिला देश  ठरला. तसेच 'सॉफ्ट लँडिंग'  हे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याचे तंत्रज्ञान विकसित करणारा भारत हा चौथा देश ठरला अशी माहिती चांद्रयान 3 चे  प्रकल्प संचालक डॉ. पी. वीरमुथुवेल यांनी आज नागपूरात दिली. २३ ऑगस्ट या चंद्रयान 3 च्या  यशस्वी मोहिमेच्या स्मरणार्थ केंद्र सरकार द्वारे हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून साजरा केला जाणार आहे. याच्याच  पूर्वतयारीचा भाग असलेल्या 'टचिंग द मून व्हाईल टचिंग द लाईव्हस - इंडियाज् स्पेस सागा' या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन नागपुरातील

अंबाझरी रोड स्थित  राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था -व्हीएनआयटी संस्थेद्वारे  इसरो, ऍक्सिस आणि  विज्ञान भारती यांच्या सहकार्याने आज करण्यात आलं आहे. या कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी वीरमुथुवेल बोलत होते .यावर्षीच्या अंतराळ दिवसाची संकल्पना 'टचिंग द मून व्हाईल टचिंग द लाईव्हस - इंडियाज् स्पेस सागा  असून या  संकल्पनेमागील अर्थ  इसरो येथील स्पेस प्रोग्रॅम विभागाचे संचालक डॉ. तीर्थ दास यांनी समजावून सांगितला. याप्रसंगी  शालेय विद्यार्थी आणि संशोधकांनी  विचारलेल्या प्रश्नांना डॉ. वीरमुथुवेल यांनी उत्तर दिलं.  या कार्यक्रमा प्रसंगी विज्ञान भारतीने आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा, हॅकेथॉन, आयडीओथॉन स्पर्धेतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलं.

**राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार**

संशोधनाच्या क्षेत्रात प्रतिष्ठेचा मानला जाणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारासाठी यवतमाळच्या मुकूटबन इथल्या  डॉ विवेक पोलशेट्टीवार यांची निवड झाली आहे. त्यांना रसायनशास्त्राचा शांती स्वरूप भटनागर पुरस्कार जाहीर झाला आहे. २३ ऑगस्टला दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते या वैज्ञानिकांचा गौरव करण्यात येणार आहे. पोलशेट्टीवार हे यवतमाळ जिल्ह्यातील मुकुटबन या छोट्याशा गावातील मुळ रहिवासी आहेत. सध्या ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये प्राध्यापक  आहेत. पोलशेट्टीवार यांनी हवेतील कार्बनचे घटक वेगळे करून त्याचे उपयोगी घटकात रुपांतर करण्याबाबत संशोधन केल  आहे. प्रदुषण मुक्तीच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जाते. हवामान बदल, जागतिक तापमान वाढ या विषयावर ते संशोधन करीत असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये त्यांचे शोध प्रबंध प्रसिद्‌ध झाले आहेत.

**स्वातंत्र्य दिन**

नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात भारतीय स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापनदिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमाचं  आयोजन करण्यात येणार असून उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारीबाबत विभागीय आयुक्त् विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज सर्व संबंधित यंत्रणेचा आढावा घेतला.

**हर घर तिरंगा**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देशभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. नागरिकांनी या देशभक्तीपर अभियानांतर्गत हर घर तिरंगा अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन वर्धा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. हर

घर तिरंगा उपक्रमांतर्गत विविध नियोजनाबाबत आढावा बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

उद्या पासून ते 15 ऑगस्ट 2024 दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियांनादरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणर असून त्यामध्ये तिरंगा रॅली, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा यात्रा, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हॉस, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फीज, तिरंगा टिब्युट, तिरंगा मेळा या बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

**पॅरिस ऑलिम्पिक**

पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरल्यानंतर भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिनं आज आपल्या निवृत्तीची घोषणा केली. समाजमाध्यमावर पोस्ट करत आपण सर्व चाहत्यांच्या आणि देशवासियांच्या कायम ऋणात राहू असं विनेशनं म्हटलं आहे.

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतआज भालाफेकपटू निरज चोप्रा सुवर्ण पदकासाठी खेळणार आहे. रात्री १२ वाजता या स्पर्धेलासुरुवात होईल.

हॉकीमध्ये भारतीय पुरुष संघाचा कांस्य पदकासाठीचा सामना आज स्पेन सोबत सुरु आहे. शेवटची माहिती हाती आली तेव्हा दुसऱ्या क्वाटरमध्ये स्पेनने एक गोल केला आहे.

कुस्तीमध्ये पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात अमन सहरावतने उपांत्य सामन्यात धडक दिली आहे. २०२२ चा जगज्जेता अल्बानियाचा झेलीमखान अबाकारोव्ह याला १२-० अशा तांत्रिक श्रेष्ठतेने हरवत अमन सहरावतने पदकाच्या आशा कायम केल्या आहेत. उपांत्य सामन्यात आज सहरावतचा सामना जपानच्या रेई हिग्युची सोबत रात्री पावणे दहा वाजता होणार आहे. मात्र महिलांच्या ५७ किलोवजनी गटात अंशु मलिक अमेरिकेच्या खेळाडू कडून ७-२ ने पराभूत झाली आहे.

#####